आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१७ मे २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरोधात भारताची भूमिका मांडण्यासाठी केंद्रसरकार विविध देशांमध्ये बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळ पाठवणार

- आयएसआय दहशतवादी संघटनेतल्या स्लीपर मॉड्यूल च्या दोन सदस्यांना मुंबई विमानतळावर अटक

- एका आठवड्यानंतर आयपीएल क्रिकेट स्पर्धा पुन्हा सुरू / बेंगळुरूमधे रंगणार रॉयल चॅलेंजर्स विरुद्ध कोलकाता नाईटरायडर्स मधला सामना

**आणि**

- राज्यभरात विविध जिल्ह्यात अवकाळी पावसाची हजेरी

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरोधात भारताची भूमिका मांडण्यासाठी केंद्रसरकार सात बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळं विविध देशांमध्ये पाठवणार आहे. या महिन्याच्या अखेरीला ही प्रतिनिधिमंडळं संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या सदस्यांसह प्रमुख भागीदार देशांना भेट देतील. या प्रतिनिधी मंडळात विविध राजकीय पक्षांचे खासदार, प्रमुख राजकीय व्यक्तिमत्व आणि प्रतिष्ठित राजनैतिक अधिकाऱ्यांचा समावेश असेल. भाजपचे रवी शंकर प्रसाद आणि बैजयंत पांडा, काँग्रेसचे शशी थरूर, जदयूचे संजय कुमार झा, डीएमके च्या कनिमोळी, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळे आणि शिवसेनेचे श्रीकांत शिंदे हे सात नेते आपापल्या प्रतिनिधिमंडळांचं नेतृत्व करतील. ही सर्वपक्षीय प्रतिनिधिमंडळं दहशतवादाविरोधातला भारताचा शून्य सहिष्णुता दृष्टिकोन जगासमोर मांडतील,

अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली. राजकीय मतभेदांच्या पलीकडे, राष्ट्रीय एकतेचं हे शक्तिशाली प्रतीक असल्याचं ते म्हणाले. दरम्यान, काँग्रेस नेते शशी थरूर यांनी जगातल्या ५ देशांमध्ये भारताच्या प्रतिनिधी मंडळाचं नेतृत्व करण्याची जबाबदारी आपल्यावर सोपवल्याबद्दल केंद्रसरकारचे आभार मानले आहेत. राष्ट्रहितासाठी आणि आपल्या सेवेची आवश्यकता असेल, त्या वेळी आपण सदैव उपलब्ध राहू, असं त्यांनी म्हटलं आहे.

भारताच्या प्रतिनिधी मंडळाचं नेतृत्व करण्याची जबाबदारी स्वीकारताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रधानमंत्री, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू आणि परराष्ट्र मंत्रालयाचे आभार मानले आहेत. भारत जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने झपाट्याने वाटचाल करत आहे, मात्र काही देश दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या देशांच्या पाठीशी आहेत, हे दुर्दैव असल्याचं प्रतिनिधी मंडळाचे सदस्य शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारतीय सेनादलांनी केलेल्या ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशात ठिकठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत. महाराष्ट्रातही जनसामान्यांमधे ऑपरेशन सिंदूर बद्द्ल अभिमान आणि गौरवाची भावना व्यक्त होत आहे.

**हिंगोली** इथे गांधी चौकातून काढलेल्या तिरंगा यात्रेत राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आमदार तानाजी मुटकुळे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि नागरिक सहभागी झाले होते.

**सांगली** शहरात हुतात्मा चौकातून निघालेल्या तिरंगा यात्रेत आमदार सुधीर गाडगीळ यांच्यासह अनेक नागरिक तिरंगी झेंडे घेऊन सहभागी झाले होते. ऑपरेशन सिंदूरविषयी यावेळी नागरिकांनी प्रतिक्रिया दिली..

**होल्ड- बाईट**

आता ऐकूया **धुळे** जिल्ह्यातल्या प्रतिक्रिया……

**होल्ड- बाईट**

**कोल्हापूर** शहरातल्या दसरा चौकातून आज सकाळी निघालेल्या तिरंगा यात्रेत खासदार धनंजय महाडिक, आमदार अमल महाडिक, भाजपचे पदाधिकारी आणि अनेक नागरिक मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते.

**पालघर** शहरात आज काढण्यात आलेल्या तिरंगा यात्रेत वनमंत्री गणेश नाईक, खासदार डॉ.हेमंत सावरा, आमदार हरिश्चंद्र भोये यांच्यासह शहरातले नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**सोलापूर, गोंदिया, तुळजापूर, भंडारा, गडचिरोली** तसेच **नवी मुंबईत सानपाडा** इथेही तिरंगा यात्रा काढण्यात आल्या होत्या.

भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश महिला मोर्चातर्फे सिंदूर यात्रांचं आयोजन राज्यभरात करणार असून मोठ्या संख्येने महिलांनी त्यात सहभागी व्हावं असं आवाहन महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी केलं आहे. मुंबईत भाजप प्रदेश कार्यालयात आज त्या वार्ताहरांशी बोलत होत्या.

**<><><><><>**

केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान उद्या राज्याच्या दौऱ्यावर असून या वेळी ते नागपूरला भेट देणार आहेत. यावेळी ते ‘विकसित कृषी’ या विषयावरच्या उच्चस्तरीय बैठकीचं अध्यक्षपद भूषवतील आणि नागपूर जिल्ह्याच्या प्रमुख कृषी विषयक आणि ग्राम विकास योजनांचा आढावा घेतील. आपल्या दौऱ्यात ते ‘नॅशनल सॉईल स्पेक्ट्रल लायब्ररीचं’ उदघाटन करतील. या कार्यक्रमात कृषी क्षेत्रासाठी

नवोन्मेषी योगदान देणाऱ्या प्रगतिशील शेतकऱ्यांचा गौरव केला जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

स्वतःच्या मालकीच्या घरापासून वंचित असलेल्या लोकांना घरं मिळवून देण्यासाठी शासन वचनबद्ध असून पट्टे वाटपाच्या माध्यमातून त्यांना हक्काची घरं मिळतील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. नागपूर मधल्या हैद्राबाद हाऊस इथं आयोजित केलेल्या जनता दरबारात ते आज बोलत होते. सर्वांसाठी घरे योजना- २०२२ या धोरणाच्या अंतर्गत  नागपुर शहरामधील नझुलच्या जागेवरील ३ हजार ७१४ झोपडपट्टी धारकांचे अतिक्रमण नियमित करण्यात आले आहे. त्यापैकी ७ वेगवेगळया झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या २१ झोपडीधारकांना यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रातिनिधिक  स्वरुपात पट्टे वाटप करण्यात आलं.

**<><><><><>**

एनआयए, अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेनं आयएसआय या बंदी घालण्यात आलेल्या दहशतवादी संघटनेच्या स्लीपर मॉड्यूल च्या दोन सदस्यांना अटक केली आहे. २०२३ साली महाराष्ट्रात पुणे इथं आयईडी ही स्फोटकं बनवणं आणि त्याची चाचणी केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे.  एनआयएनं त्यांना मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर अटक केली असून, ते इंडोनेशियाच्या जकार्ता इथून परतले होते. हे दोन्ही आरोपी गेली दोन वर्ष फरार होते आणि एनआयएच्या मुंबईतल्या विशेष न्यायालयानं त्यांच्या विरोधात अजामीनपात्र वॉरंटही जारी केलं होतं. दोन्ही आरोपींची माहिती देणाऱ्यांना एनआयएनं  प्रत्येकी ३ लाख रुपयांचं  रोख बक्षीस जाहीर केलं होतं.  या प्रकरणाचा तपास सुरू असल्याचं एनआयए च्या सूत्रांनी सांगितलं.

**<><><><><>**

एका आठवड्यानंतर आज पुन्हा आयपीएल क्रिकेट स्पर्धा सुरू होत आहे. यजमान रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यातील सामना बंगळुरूमध्ये चिन्नास्वामी स्टेडियम इथं आज संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होणार आहे. मात्र, पाऊस सुरु असल्यानं खेळपट्टीवर आच्छादन असून नाणेफेक ठरलेल्या वेळी होऊ शकली नाही. यापूर्वी, भारत आणि पाकिस्तानमधील तणावामुळं नऊ मे रोजी आयपीएल स्पर्धा स्थगित करण्यात आली होती. उर्वरित सामन्यांचं नवीन वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे. मोहाली आणि धरमशाला इथं आता सामने होणार नाहीत. २५ मे रोजी होणारा अंतिम सामना आता ३ जून रोजी होणार आहे. प्लेऑफ सामन्याची ठिकाणं यथावकाश जाहीर होतील.

**<><><><><>**

राज्यातल्या उद्योगधंद्यांना प्रशिक्षित आणि कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी विविध भागांमध्ये कौशल्यवर्धन केंद्रे उभारण्यात येतील असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. पुणे महानगरपालिका आणि टाटा समूहाच्या संयुक्त विद्यमाने पुण्यात बाणेर इथे उभारण्यात येणाऱ्या कौशल्यवर्धन केंद्राच्या भूमिपूजन समारंभात ते आज बोलत होते. टाटा समूहाच्या सहभागातून राज्यात चंद्रपूर, गडचिरोली येथे कौशल्यवर्धन केंद्राची उभारणी करण्यात येत आहे. तसच कल्याण डोंबिवली, रत्नागिरी, पुणे, शिर्डी, बीड, नांदेड, छत्रपती संभाजीनगर या ठिकाणीही काम सुरु आहेत. स्थानिक प्रशासनाच्या मदतीने त्यांना सर्व प्रकारचे सहकार्य करण्यात येत आहे, असं पवार यांनी सांगितलं.

**<><><><><>**

काश्मीर पूर्वीही भारताचाच भाग होता आजही आहे आणि भविष्यातही राहील असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. मुंबईत सेनाभवन इथं आयोजित खासदार, आमदार आणि जिल्हा प्रमुखांच्या बैठकीला ते संबोधित करत होते. देशावर संकट आल्यास आपण सरकारबोरबर एकजुटीने उभे राहू, असं ते म्हणाले.

एक देश एक निवडणूक संकल्पना म्हणून ठीक आहे परंतु प्रधानमंत्री आणि मुख्यमंत्र्यांनी प्रचारात भाग घेता कामा नये, असं मत त्यांनी व्यक्त केलं.

**<><><><><>**

राज्यात आज अनेक ठिकाणी अवकाळी पावसानं हजेरी लावली. **परभणी** जिल्ह्यात आज संध्याकाळी विजेचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. पावसामुळे अनेक ठिकाणी लग्न समारंभात लोकांची तारांबळ उडाली. जिल्ह्यात पुढचे चार दिवस असंच वातावरण राहण्याची शक्यता आहे. **सिंधुदुर्ग** जिल्ह्यात आज कणकवली कुडाळसह अनेक ठिकाणी ढगांच्या गडगडाटासह पाऊस झाला. या अवकाळी पावसामुळे नागरिकांना वाढलेल्या तापमानपासून दिलासा मिळाला आहे. **नांदेड** जिल्ह्यासाठी येत्या बुधवारपर्यंत येलो अलर्ट जारी केला आहे. या महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे **जळगाव** जिल्ह्यात १० हजारहून अधिक हेक्टर वरच्या पिकाचं नुकसान झालं आहे.

**//<><><><><>//**